# दिनांक 24/04/2025

1 दिघी सागरी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 22/04/2025 रोजी 20:00 वा च्या सुमारास मौजे दिवेआगर ता.श्रीवर्धन फिर्यादी यांची पत्नी व साक्षीदार अशा दोघी फिर्यादी यांचे घराचे ओटीवर उभी राहून दिनेश नामदेव चोगले यांने प्रांत कार्यालयात श्रीवर्धन येथे केलेल्या अर्जाबाबत चर्चा करीत दिवेआगर ग्रामपंयायत सदस्य यांना बडबड करीत होत्या त्या गोष्टीचा आरोपीत क्र.01 ते 09 यांनी मनात राग धरून सर्वांनी मिळून फिर्यादी यांची पत्नीस व साक्षीदार अशा दोघींना शिवीगाळ करून दमदाटी करू लागले तसेच फिर्यादी व साक्षीदार असे तिघांना आरोपीत क्र.01 ते 09 यांनी मिळून हाताबुक्यांनी माराहाण करून दुखापत केली.

याबाबत दिघी सागरी पोलीस ठाणे गुरनं.24/2025, भारतीय न्याय संहिता 189(2),191 (2),190,352,351(2),115(2),125 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/श्री.शेख हे करीत आहेत.

2. खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 20/04/2025 रोजी 00:00 वा ते दि. 22/04/2025 रोजी 00:00 वा च्या दरम्यान मौजे वेलविशर अपार्टमेंट खोपोली ता.खालापुर येथे आरोपीत रा. मु.पो.बनिया, जि.कटक, राज्य ओडिसा, सध्या रा.रूम नं.602 बिल्डींग नं.09 वेलविशर अपार्टमेंट खोपोली ता.खालापुर याने पिडीत क्र.01 ते 03 या अल्पवयीन असल्याचे माहीत असताना देखील पिडीत क्र.01 हीस त्याचे मोबाईल फ़ोनमध्ये अश्लिल व्हीडिओ दाखविला तसेच तिचे गुपचुप फ़ोटो काढण्याचा प्रयत्न केला. पिडीत क्र.02 व 03 यादेखिल अल्पवयीन असल्याचे माहित असताना देखिल त्यांना वाईट उद्देशाने त्यांचे शरिरीला स्पर्श केला. तसेच पिडीत क्र.1 व 2 या गार्डनमध्ये खेळत असताना आरोपीत याने त्याचे घराचे गॅलरीमध्ये अश्लील कृत्य वाईट उद्देशाने मुलींकडे पाहत असल्याचे पिडीत मुलींनी पाहिलेले आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीस दिनांक 23/04/2025 रोजी 04:21 वा च्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे गुरनं.111/2025, बाल लै.अत्या.संरक्षण (POCSO) अधिनियम, 2012 चे कलम 8,12, भारतीय न्याय संहिता कायदा 2023 74,79 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/श्रीम.पूजा चव्हाण हे करीत आहेत.

3. कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 20/04/2025 रोजी 06:30 वा च्या सुमारास मौजे चारफाटा दिशेच्या रस्त्याने डॉ नानासाहेब धर्माधिकारी प्रवेशव्दार पासून साधारण 200 मिटर अंतरावरील पुलावर ता.कर्जत येथे जखमी किशोर धबूराव चौधरी हे त्याचे राहते घरातून कोतवाल नगर येथून चारफाटा दिशेने रसत्याच्या डाव्या बाजूने मॉर्निग वॉकला निगाले होते

रस्त्यांच्या कडेला चालत असताना कोतवाल नगर येथून चारफाटा दिशेने डॉ नानासाहेब धर्माधिकारी प्रवेशव्दार पासुन चारफाटा दिशेने साधारण 200 मिटर अंतरावर पूलावर जखमी किशोर धबूराव चौधरी चालत आले असताना दहिवली दिशेकडुन चार फाटा दिशेकडे एका अज्ञात चारचाकी वाहणावरील आज्ञात चालकाने रस्त्याच्या परीस्थितीकडे दुर्लक्ष करून भरधाव वेगाने हयगयीने वाहन चालून जखमी किशोर धबुराव चौधरी यांना मागून जोरदार धडक दिली व त्यांना झालेल्या गंभीर दुखापतीस कारणीभूत होवून आपघाताची खबर न देता अपघातस्थ वरून किशोर धबूराव चौधरी यांना जखमी अवस्थेत अपघातस्थळी चारफाटा येथे सोडून चार फाटा चौक दिशेने निगून गेला.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे गुरनं.109/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 184,134, भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 281,125(a)(b) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/काठे हे करीत आहेत.

4. महाड शहर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 18/04/2025 रोजी 15:15 वा च्या सुमारास मौजे महाड गांधारी पुलाजवळ सय्यद मोटर्स महाड ता.महाड येथे फिर्यादी रा.रुम नं.101 पहिला मजला बिलकिस कॉम्प्लेक्स महाड यांचे महाड शहरातील गांधारी पुलाजवळ सय्यद मोटर्स येथे विक्री करण्याकरीता ठेवण्यात आलेली मारूती सुझुकी कंपनीची व्हॅगनर कार क्र.एमएच-43 ए टी 8963 ही कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांच्या संमतीशिवाय लबाडीच्या इरादयाने स्वत:चे फायदयाकरीता चोरी करुन घेवुन गेला.

याबाबत महाड शहर पोलीस ठाणे गुरनं.38/2025, BNS 303(2) प्रमाणे प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/श्री.गर्जे हे करीत आहेत.

5. नेरळ पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 23/04/2025 रोजी 18:00 वा च्या सुमारास मौजे नेरळ गावच्या हददीत हेटकर आळी कल्याण फाटा ता.कर्जत येथे आरोपीत रा.मोहाचीवाडी नेरळ ता.कर्जत हा मा.जिल्हाधिकारी, रायगड अलिबाग यांचे जमावबंदी आदेश लागू असतांना काळया रंगाची लोखंडी धारदार तलवार कबज्यात बाळगतांना मिळून आला. सदर गुन्ह्यातील आरोपीस दिनांक 24/04/2025 रोजी 01:29 वा च्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

याबाबत नेरळ पोलीस ठाणे गुरनं.64/2025, मुंबई पोलीस अधिनियम,1951 37(1)/135 , भारतीय हत्यार कायदा कलम 1959 चे कलम 4,25 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोना/साळुंके हे करीत आहेत.

6. कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 23/04/2025 रोजी 18:10 वा च्या सुमारास मौजे कडाव गावचे हददीतील कर्जत मुरबाड रस्त्याला लागून असलेल्या नाल्याजवळ ता.कर्जत येथे महिला फिर्यादी रा.कडाव ता.कर्जत यांचे सास-यांनी आरोपीत यास शेती विक्री केली होती त्या व्यवहाराचे पैसे न दिल्यामुळे फिर्यादी यांच्या सास-यांनी आरोपी यांचे विरुध्द मा.दिवाणी न्यायालय कर्जत येथे दावा दाखल केला असून तो न्यायप्रविष्ठ आहे फिर्यादी त्यांच्या मुलीला घेवून कडाव गावाचे शेजारी कर्जत मुरबाड रस्त्याला लागुन असलेल्या नाल्याजवळ फिरायला गेले

असता आरोपी व त्याची पत्नी असे एक काळया रंगाच्या थार गाडी मधुन फिर्यादी यांच्या जवळ येवुन आरोपीत याने तुम्हाला कसले पैसे पाहिजेत असे बोलून महिला फिर्यादी यांचा डावा हात पिरगळून दूखापत केली तसेच फिर्यादी यांच्या अंगावरील ओढणी ओढून तू मुलांना शाळेत व टयुशनला सोडायला जाते ना, तेव्हा तुझा बलत्कार केल्याशिवाय राहणार नाही अशी धमकी देवून फिर्यादी यांचे छातीला हात लावून त्यांचे स्त्री मनास लज्जा उत्पन्न केली.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे गुरनं.110/2025, भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम- 74,115(2),351(2)अन्वये प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/भागवत हे करीत आहेत.

7. रेवदंडा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 22/04/2025 रोजी 23:50 वा च्या सुमारास मौजे रेवदंडा अलिबाग रोड लगत प्रफुल्ल बार जवळ, अलिबाग येथे फिर्यादी यांना मिळालेल्या गोपनिय बातमीनुसार रेवदंडा ता.अलिबाग येथील प्रफुल्ल बार जवळअंधारामध्ये उभ्या असलेल्या दोन्ही बाजुच्या नंबर प्लेट काढलेल्या स्थितीतील संशयीत सफेद रंगाचे अल्टो कार मधील इसमांची तसेच कारची पोसई श्री गांगुर्डे रेवदंडा पोलीस ठाणे व पोलीस स्टाफ यांनी झडती घेतली असता सदर कार मधील अरोपीत क्र.01,02 व 03 यांनी त्यांचे ताब्यातील अल्टो कारच्या दोन्ही बाजुच्या नंबर प्लेट जावीवपुर्वक काढुन ठेवुन कोणता तरी गंभीर स्वरुपाचा गुन्हया करण्याचे पुर्व तयारीनिशी व उद्‌देशाने एक धारदार लोखंडी पात्याची तलवार तसेच दोन धारदार पात्याच्या लोंखडी कात्या अशी घातक शस्त्रे आणि स्क्रुडायव्हर सुरी लोखंडी पाने असे साहीत्य कार मध्ये ठेवुन स्वतःचे ताबे कब्जात बाळगळे स्थितीत मिळुन आले. सदर गुह्यातील 03 आरोपी यांना दिनांक 23/04/2025 रोजी 13:18 वा च्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

याबाबत रेवदंडा पोलीस ठाणे गुरनं.43/2025 शस्त्र अधिनियम, 1959, इतर, शस्त्र अधिनियम, 1959 चे कलम 4, 25 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई श्री.शिवकुमार नंदगांवे हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 23.04.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 215 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 2,34,900/-रुपये इतका दंड आकारला आहे.